N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म -

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** गडचिरोली **P.S.(ठाणे):** गडचिरोली **Year (वर्ष):** 2019

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0221 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 08/04/2019 21:18 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 08/01/2019

**Date To ( दिनांक पर्यंत):** 08/04/2019

**Time From (वेळेपासून):** 15:37 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 13:30 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 08/04/2019 **Time (वेळ):** 20:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद** 050 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 08/04/2019 21:18 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्तळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** उत्तर, 12 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** ग्रामपंचायत कार्यालय दिभना ,गडचिरोली

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नांव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** श्री मनोहर दामाजी वाकडे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती का नाव)**

(c) **Date/Year of Birth (जन्म** 1978 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (अदा केल्याची तारीख):**

**Place of Issue (अदा केल्याची ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

# फिर्याद

दिनांक 08/04/2019

मी श्री मनोहर दामाजी वाकडे, वय 41 वर्षे, जात - महार (एस.सी.) धंदा - खाजगी, रा. कारमेल स्कुल जवळ, गेस्ट हाउस गल्ली, गडचिरोली; पो.स्टे. ता. जि. गडचिरोली. मो.नं. 9404830519. मी दिनांक 07/01/2019 रोजी पोलीस निरीक्षक श्री रवि गोपाळराव राजुलवार, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय गडचिरोली यांचे समक्ष लोकसेवकांविरूद्ध लाच मागणी संबंधाने तक्रार नोंदविली. पोलीस निरीक्षक श्री रवि राजुलवार यांनी माझे सांगण्याप्रमाणे माझी तक्रार माझे हस्ताक्षरात लिहून त्यावर माझी सही घेतली मी नोंदवलेली तक्रार खालीलप्रमाणे आहे. "मी राजर्षी शाहु महाराज शैक्षणिक विकास संस्थेचा संस्थापक संचालक अध्यक्ष आहे. ही संस्था महा. 07/2011 एफ 5898 अन्वये नोंदणीकृत असुन सदर संस्थेअंतर्गत ग्राम खरपुंडी येथे राजर्षी शाहु महाराज स्कुल ही शाळा चालवितो. आमच्या शाळेला महाराष्ट्र राज्य शासनाची तसेच शिक्षण उपसंचालक, नागपुर विभाग यांची सुद्धा मान्यता आहे. दिवसेदिवस विद्यार्थ्यांची संख्या वाढत असल्याने शाळेकरिता सध्याची जागा अपुरी पडत असल्यामुळे संस्थेला शैक्षणीक प्रयोजनार्थ मौजा खरपुंडी येथील भुमापन क्रं53/2/अ आराजी 0.91 हे. आर. ही जागा भोगवटा मुल्य भरून मिळावी याकरिता मी मा. तहसिलदार साहेब, गडचिरोली यांना दि.22/12/2017 रोजी निवेदन अर्ज दिला. त्यांनी कायदेशीर प्रक्रिया तसेच इतर संबंधीत विभागाचे नाहरकत प्रमाणपत्र मागविले. त्यानुसार मला जवळपास सर्व विभागांची मंजुरी मिळाली. त्यानंतर मा. तहसिलदार साहेबांनी दि.06/04/2018 रोजी उद्घोषणा करून सदर जागेसंबंधी आक्षेप असल्यास दि.21/04/2018 रोजी पुर्वि आक्षेप नोंदविण्याबाबत संबंधीतांना कळविले. मा. तहसिलदार साहेबांच्या उद्घोषणेनंतर जागेसंबंधी कोणाची काही अडचण आहे काय? याबाबत विचारणा करण्यास मी दि. 25/04/2018 रोजी ग्रामपंचायत खरपुंडी येथे जावुन चौकशी केली असता; सरपंच आनंदराव नैताम मला म्हणाले कि, "आम्हाला न भेटता तुझी जागा कशी काय मंजुर होईल?" यावर मी त्यांना तहसिलदार साहेबांचा आदेश असल्याचे सांगीतलें असता; सरपंच मला म्हणाले, "जागा कोणाला द्यायची? कोणाला नाही द्यायची? याबाबत फक्त माझेच म्हणने चालते. तु मले येवुन भेटला नाही. तु मले विचारपुस केला नाही. त्यामुळे तुझ्या शाळेची जागा ग्रामपंचायतीमधुन मंजुर होणार नाही." असे म्हणाले. त्यानंतर दि.30/04/2018 रोजी ग्रामपंचायत खरपुंडी येथे जावुन ग्रामसेविका श्रीगीरीवार मॅडम यांना शाळेच्या मंजुर जागेसंबंधी विचारणा केली असता; त्यांनी मला "दि.27/04/2018 च्या मासिक बैठकिचा इतिवृत्तांत दाखवुन त्यामध्ये "शाळेकरिता जागा नाकारण्यात येत असुन" त्याऐवजी ठरावामध्ये मुख्यमंत्री सौर कृषी फिडर योजना प्रकल्पाकरीता मंजुर करण्यात आली आहे" असे सांगीतले. त्यामुळे मी त्यांना कारण विचारले असता; त्यांनी मला "माझा खर्चापाणी करावा लागेल." असे सांगुन त्यावेळी माझेकडे असलेले रू.10,000/- मागुन घेतले. आणि "तुमचं काम करून देते. तुम्ही ग्रामपंचायतीला जागेच्या मागणी संदंर्भात पत्र द्या." असे म्हणाल्या. त्यामुळे दि.03/05/2018 रोजी मी जागेच्या मागणीबाबत पत्र घेवुन ग्रामपंचायतीमध्ये गेलो असता; ग्रामपंचायतीमध्ये सरपंचासोबत इतर लोकं बसुन असल्यामुळे सरपंच श्री आनंदराव नैताम यांनी माझेकडुन पत्र स्विकारून "नंतर भेट" असे म्हणाले. मी ग्रामसेविका श्रीगीरीवार मॅडम यांची भेट घेवुन त्यांना जागेच्या पत्राबाबत सांगुन काय झाले? याबाबत विचारणा केली असता; त्यांनी त्यांच्यापर्यंत "शाळेसाठी जागेच्या मागणी संबंधीचे पत्र पोहोचलेच नाही." असे सांगुन "परत यावेळी माझे हातात पत्र द्या." अशा म्हणाल्या. त्यामुळे दि.10/05/2018 रोजी मी जागेच्या मागणीबाबत पत्र घेवुन ग्रामपंचायतीमध्ये गेलो असता; ग्रामसेविका श्रीगिरीवार मॅडम यांनी माझेकडुन पत्र स्विकारून "नंतर कळविते." असे म्हणाल्या. त्यावेळी ग्रामपंचायतीबाहेरच मला उपसरपंच श्री कमलेश खोब्रागडे यांनी मला "माझा खर्चा-पाणी वेगळा करावा लागेल." असे सांगुन "मला पत्र देशील तेव्हाच तुझं काम होईल." असे म्हणाले. त्यामुळे दि.17/05/2018 रोजी परत मी शाळेच्या जागेच्या मागणीसंदंर्भात पत्र घेवुन ग्रामपंचायतीमध्ये गेलो असता; ग्रामपंचायतीमध्ये गर्दी असल्याने उपसरपंच श्री कमलेश खोब्रागडे यांनी माझेकडुन पत्र स्विकारून "नंतर भेट" असे म्हणाले. परंतु दरम्यानच्या काळात माझे शाळेच्या जागेच्या मंजुरीसंबंधी ग्रामपंचायत खरपुंडी येथुन कोणत्याही प्रकारची हालचाल दिसुन न आल्याने मी ग्रामपंचायत खरपुंडी येथे दिलेल्या अर्जाबाबत ठराव मंजुर झाला किंवा नाही? याची चौकशी करण्याकरीता आज दि.07/01/2019 रोजी मौजा खरपुंडी ग्रामपंचायत येथे जात असतांना ग्रामपंचायतीचे आवारातच सरपंच श्री आनंदराव नैताम यांची भेट झाली. तेव्हा मी त्यांना "मी दिलेल्या अर्जावर ग्रामपंचायत मध्ये ठराव मंजुर झाला काय?" असे विचारले असता; ते मला म्हणाले की, "तुमचे राजर्शी शाहु महाराज शैक्षणिक विकास संस्थेला ग्राम खरपुंडी येथील जागेसंबंधातील ठराव मंजुर करून देण्याकरीता मला रू.50,000/- दयावे लागतील. ग्रामसेवक मॅडम व उपसरपंच यांना तुम्ही सांभाळून घ्या." असे म्हणाले तेव्हा मी त्यांना म्हणालो की, "साहेब एवढी रक्कम जास्त होते काही कमी करा" तेव्हा ते म्हणाले की, "ठराव पाहीजे असेल तर मी मनतो तेवढीच रक्कम तुम्हाला दयावी लागेल" असे म्हणुन ते निघून गेले. सत्यानंतर मी ग्रामपंचायतीमध्ये जावून तेथील ग्रामसेविका श्रीगीरीवार मॅडम यांची भेट घेतली व मी दिलेल्या निवेदन अर्जा संबंधाने ठराव मंजूर झालेला असेल तर ठरावाची प्रत द्या असे म्हणालो असता. "तुमचा ग्रामपंचायतीमधून ठराव मंजूर करुन घेण्याकरीता सरपंच, उपसरपंच यांची संमती द्यावी लागते त्यानंतरच ठराव मंजूर करण्यात येते. तुम्हाला ठराव मंजूर करुन ठरावाची प्रत पाहीजे असल्यास मला रु.50,000/- दयावे लागतील. तेव्हाच तुम्हाला मंजूर ठरावाची प्रत देण्यात येईल." तेव्हा ग्रामसेविका मॅडमला सुध्दा एवढे पैसे जास्त होतात मॅडम म्हणून विनंती केली असता, "मी म्हणते तेवढे दयावेच लागते. तेव्हाच तुम्हाला ठरावाची प्रत मिळेल." असे म्हणाले. तेव्हा मी त्यांना म्हणालो की, "ठिक आहे मॅडम पैसे जमल्यानंतर येवून भेटतो." असे म्हणून ग्रामपंचायत मधून निघून जात असतांना ग्रामपंचायतचे बाहेर उपसरपंच श्री कमलेश खोब्रागडे हे मिळाले व म्हणाले की, "तुमच्या संस्थेच्या जमीनीबाबतचा ठराव मंजूरी करीता ग्रामपंचायतीमध्ये आलेला असून ते ठराव मंजूर करण्याकरीता तुम्ही मला रु50,000/- दया नाहीतर तुमचा ठराव मंजूर होवू देणार नाही व तुमच्या कामात अडचणी आणीन." असे म्हणाला. तेव्हा मला माझे कामात अडथळे येत असल्याची भिती निर्माण झाली त्या भितीपोटी उपसरपंच श्री कमलेश खोब्रागडे यांना म्हणालो की, "साहेब एवढे पैसे जास्त होतात काही पैसे कमी करा आणि माझेकडे पैसे सुध्दा नाहीत" असे म्हणालो असता उपसरपंच श्री खोब्रागडे म्हणाले की, "जेव्हा पैसे जमतील तेव्हाच तुम्ही मंजूर ठरावाची प्रत घेवून जाण्याकरीता ग्रामपंचायत मध्ये या." असे म्हणून ते निघून गेले. त्यानंतर मी सुध्दा घरी निघून गेलो. माझे राजर्शी शाहु महाराज शैक्षणिक विकास संस्थेतील मौजा खरपूंडी येथील राजर्शी शाहू महाराज स्कूल खरपुंडी येथील विद्यार्थ्यांची संख्या वाढत असल्याने शाळेकरीता सध्याची जागा अपुरी पडत असल्यामुळे संस्थेला शैक्षणीक प्रयोजनार्थ मौजा खरपुंडी येथील भुमापन क्रं.53/2/अ आराजी 0.91 हे. आर. ही जागा भोगवटा मुल्य भरून मिळावी याकरिता संबंधीत विभागाकडून कायदेशीर मंजूरी प्राप्त केलेले असून स्थानिक ग्रामपंचायतीचा ठराव आवश्यक असल्याने संस्थेच्या वतीने मी दि.03/05/2018 रोजी मा. सरपंच/सचिव ग्रामपंचायत खरपुंडी यांना जागेबाबतचा ठराव ग्रामपंचायत कडुन मंजुर व्हावा यासाठी निवेदन अर्ज दिला होता. त्यासंबंधाने ग्रामपंचायतमध्ये ठराव मंजूर करुन त्याची प्रत देण्याचे कामाकरीता वरील प्रमाणे श्रीमती श्रीगीरीवार, ग्रामसेविका, श्री आनंदराव नैताम, सरपंच व श्री कमलेश खोब्रागडे, उपसरपंच सर्व ग्रामपंचायत खरपुंडी, ता. जि. गडचिरोली यांनी प्रत्येकी रु.50,000/- प्रमाणे एकूण रु.1,50,000/- लाच रक्कमेची मागणी करीत आहेत. ग्रामपंचायत खरपुंडी येथील ग्रामसेविका, सरपंच व उपसरपंच यांना एकूण रु.1,50,000/- लाच रक्कम देण्याची माझी मुळीच ईच्छा नसल्याने एकुण रू.1,50,000/- घेऊन मी आपले कार्यालयामार्फत कार्यवाही होणेकरीता स्वेच्छेने लाच लुचपत प्रतिबंधक विभाग गडचिरोली येथे तक्रार दिली. 1)श्रीमती श्रीगीरीवार मॅडम, ग्रामसेविका, 2)श्री आनंदराव नैताम, सरपंच व 3)श्री कमलेश खोब्रागडे, उपसरपंच सर्व ग्रामपंचायत खरपुंडी, ता. जि. गडचिरोली यांचेशी माझा कोणताही वैयक्तीक वैर नसुन आर्थिक देवाण-घेवाण/ उसणवारी अथवा भांडण नाही. म्हणुन मी त्यांचे विरुध्द कायदेशीर कार्यवाही करण्याकरीता स्वेच्छेने तक्रार दिली. मी सोबत आणलेले रु. 1,50,000/- हे माझे वैयक्तिक बचतीतील आहेत." त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री रवि राजुलवार यांनी 2 शासकिय पंचांना पाचारण करून त्यांची व माझी एकमेकांना ओळख करून दिली. श्री राजुलवार यांनी दोन्ही पंचांना थोडक्यात हकिकत सांगुन माझ्या सहीचा तक्रार अर्ज पंचांना वाचण्यास दिला. त्यानंतर सदरच्या तक्रार अर्जावर दोन्ही पंचांनी स्वाक्षरी केली. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री राजुलवार यांनी सुद्धा स्वाक्षरी केली. त्यानंतर पंचासमक्ष पोलीस निरीक्षक श्री राजुलवार यांनी व्हॉईस रेकॉर्डर कश्याप्रकारे काम करतो. याबाबत सविस्तर माहीती देवुन लाच मागणीची पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगुन पडताळणी दरम्यानचे संभाषण डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरद्वारे रेकॉर्ड करण्यात येणार असल्याचे सांगीतले आणि सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सविस्तर सुचना दिल्या. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री राजुलवार यांनी माझेकडुन सापळा कारवाईसाठी वापरण्यात येणारी लाच रक्कम रू.1,50,000/- (रू. 500/- दराच्या 280 चलनी नोटा व रू. 200/- दराच्या 50 चलनी नोटा) घेतल्या. त्यावेळी सदरच्या नोटांचे क्रमांक नोंदवुन घेण्यात आले. त्यानंतर सदरच्या नोटांना अँथ्रॅसिन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगुन त्याचे गुणधर्म व प्रात्यक्षीक करून दाखविले. त्यावेळी लाचेच्या रकमेस अँथ्रॅसिन पावडर लावली. याबाबतच्या सविस्तर नोंदी सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक श्री राजुलवार यांनी पंचनामा क्रं. 1 मध्ये घेतल्या आहेत.त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री राजुलवार यांनी पंचासमक्ष तक्रारदाराची गैरअर्जदाराविरूद्ध लाच मागणी पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगुन त्याप्रमाणे व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून व्हॉईस रेकॉर्डरवर पंच क्रं 1 यांचे आवाजाचा नमुना घेवुन व्हॉईस रेकॉर्डर माझे ताब्यात देवुन मला पंच क्रं. 1 यांचेसह गैरअर्जदार यांचेकडे जाण्यास रवाना केले. गै.अ. सरपंच श्री आनंदराव नैताम व श्री कमलेश खोब्रागडे, उपसरपंच व माझी भेट होवून त्यांचे सोबत माझे कामासंबंधाने बोलणी झाली. गै.अ. श्री आनंदराव नैताम सरपंच, ग्रामपंचायत खरपुंडी, जि. गडचिरोली यांनी स्वतःसाठी रु.50,000/- व उपसरपंचासमोर स्वतःचे व उपसरपंचाचे प्रत्येक रु.30,000/- असे एकूण रु.60,000/- असे म्हणत आहे. परंतु एकांतात त्यांचे एकटयाचे रु.50,000/- लाच रक्कमेची मागणी करीत आहेत. तसेच ग्रामसेविकेचे "तु वेगळे बोलुन घे." असे म्हणत असुन गैअ श्रीमती श्रीगीरीवार, ग्रामसेविका हया मिटींग करीता गेलेल्या असल्यामुळे त्यांची भेट झालेली नाही. त्यानंतर मी पंच क्रं. 1 सह पोलीस निरीक्षक श्री राजुलवार यांचेकडे परत आलो असता, पंच क्रं. 1 यांच्या आवाजानंतर व्हॉईस रेकॉर्डर बंद करण्यात आला. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री राजुलवार यांनी सांगीतले की, "माझे कामसंबंधाने

(h) **Address** (पत्ता):

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | गेस्ट हाउस गल्ली,कारमेल स्कुल जवळ, ,गडचिरोली,गडचिरोली,गडचिरोली,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | गेस्ट हाउस गल्ली,कारमेल स्कुल जवळ, ,गडचिरोली,गडचिरोली,गडचिरोली,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.): **Mobile** (मोबाइल नं.): 91-9404830519

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्रीमती अर्चना बाळासाहेब श्रीगीरीवार | | | 1. ग्रामपंचायत दिभना,गडचिरोली, गडचिरोली,गडचिरोली,महाराष्ट्र,भारत |
| 2 | श्री आनंदराव दादाजी नैताम | | | 1. ग्रामपंचायत खरपुंडी,गडचिरोली, गडचिरोली,गडचिरोली,महाराष्ट्र,भारत |
| 3 | श्री कमलेश अशोक खोब्रागडे | | | 1. ग्रामपंचायत खरपुंडी,गडचिरोली, गडचिरोली,गडचिरोली,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)-**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11 **Inquest Report / U.D. case No., if any** (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents** (प्रथम सूचना तथ्य ):

अप क्र :- 221/2019 कलम 7 भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन 1988 (संशोधन 2018)फिर्यादी श्री मनोहर दामाजी वाकडे, वय 41 वर्षे, जात - महार (एस.सी.) धंदा - खाजगी, रा. कारमेल स्कुल जवळ, गेस्ट हाउस गल्ली, गडचिरोली ता. जि. गडचिरोली. मो.नं. 9404830519.आरोपी :- 1) श्रीमती अर्चना बाळासाहेब श्रीगीरीवार, धंदा ग्रामसेविका, गर्मपंचायत दिभना अतीरीक्त प्रभार ग्रामपंमचाय खरपुंडी 2) श्री आनंदराव दादाजी नैताम वय 45 वर्ष धंदा शेती (सरपंच ग्रामपंचायत खरपुंडी) ता.जि. गडचिरोली3) श्री कमलेश अशोक खोब्रागडे वय 29 वर्ष धंदा शेती, (उपसरपंच ग्रामपंचायत खरपुंडी) ता.जि. गडचिरोलीघटनास्थळ - मौजा ग्रामपंचायत कार्यालय दिभना 12 कि.मी. उत्तरघटना ता. वेळ - दि. 08/01/2019 चे 15:37 वा ते 08/04/2019 चे 13:30 वा. पर्यंत दाखल ता.वेळ - दि. 08/04/019चेदाखल अधिकारी :- सफौ/398 गजानन सहारे पोस्टे गडचिरोलीतपासी अधिकारी :- पो नि रवी गोपाळराव राजुलवार लाच लुचपत प्रतीबंधक विभाग गडचिरोली हकीकत या प्रमाणे आहे की, घटणा ता. वेळी व ठिकाणी यातील तक्रारदार यांचे तक्रारी वरुण दि. 07/01/2019 ते 08/04/2019 दरम्यान लाच मागणी पडताळणी केली असता गैरअर्जदार श्रीमती श्रीगिरीवार ग्रामसेवीका, श्री आनंदराव नैताम सरपंच व श्री कमलेश खोब्रागडे उपसरपंच ग्रामपंचायत खरपुंडी यांनी तक्रारदार यांचे राजर्षी शाहु महाराज शैक्षणीक संस्थेला शैक्षणीक प्रयोजनार्थ शासकीय जमीन ठराव घेवुन मंजुर करुण देण्याच्या कामाकरीता प्रत्येकी 50 हजार असे एकुण 1,50,000/- रुपये लाच रक्कमेची मागणी करुण गैरअर्जदार श्रीमती श्रीगिरीवार ग्रामसेवीका यांनी तडजोळी अंती 40,000/- रुपये व गैरअर्जदार श्री आनंदराव नैताम सरपंच तसेच श्री कमलेश खोब्रागडे उपसरपंच ग्रामपंचायत खरपुंडी यांनी तडजोळी अंती प्रत्येकी 25,000/- रुपये याप्रमाणे एकुण 90,000/- रुपये लाच रक्कमेची पंचसाक्षीदारा समक्ष सुस्पष्ट मागणी केलेली असल्याने नमुद कलमांन्वये गुन्हा नोंद करुण तपासात घेतला.टिप :- प्रथम खबरी संदर्भात 8000 शब्दांची मर्यादा असल्याने पुढील पानावर सवीस्तर लेखी फिर्याद नोंद करण्यात येते.

गै.अ. क्र. 1 श्रीमती श्रीगीरीवार, ग्रामसेविका यांची सुध्दा लाचेची मागणी असल्याने व त्या मिळून न आल्याने तसेच गै.अ. श्री आनंदराव नैताम, सरपंच व श्री कमलेश खोब्रागडे, उपसरपंच याची लाचेची मागणी स्पष्ट आहे. परंतु त्यांचा लाचेचा आकडा निष्चित नसल्याने पुनःपडताळणी करण्यात येईल." त्यानंतर मला घरी जाण्यास सांगुन जेव्हा बोलाविण्यात येईल तेव्हा ला.प्र.वि. कार्यालय गडचिरोली येथे येण्याच्या सुचना दिल्या. याबाबतच्या सविस्तर नोंदी सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक श्री राजुलवार यांनी पडताळणी स्थगीती पंचनामा क्रं 2 मध्ये घेतल्या आहेत.त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री राजुलवार यांनी दि.09/01/2019 रोजी मला बोलावून घेतले. त्यावेळी पंचासमक्ष गैरअर्जदार यांचे विरूद्ध लाच मागणी पुनःपडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगुन त्याप्रमाणे व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून व्हॉईस रेकॉर्डरवर पंच क्रं.1 यांचे आवाजाचा नमुना घेवुन व्हॉईस रेकॉर्डर माझे ताब्यात देवुन मला पंच क्रं.1 यांचेसह गैरअर्जदार यांचेकडे जाण्यास रवाना केले. गै.अ. श्रीमती श्रीगीरीवार, ग्रामसेविका व माझी भेट होवून त्यांचे सोबत माझे कामासंबंधाने बोलणी झाली. गै.अ. श्रीमती श्रीगीरीवार, ग्रामसेविका, ग्रामपंचायत खरपुंडी, जि. गडचिरोली यांनी माझे कामासंबंधाने रु.50,000/-, कधी रु.40,000/- तर कधी रु.20,000/- लाच रक्कमेची मागणी केली होती. त्यानंतर मी पंच क्रं.1 सह पोलीस निरीक्षक श्री राजुलवार यांचेकडे परत आलो असता, पंच क्रं.1 यांच्या आवाजानंतर व्हॉईस रेकॉर्डर बंद करण्यात आला. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री राजुलवार यांनी सांगीतले की, "माझे कामसंबंधाने गै.अ.क्र.1 श्रीमती श्रीगीरीवार, ग्रामसेविका व गै.अ. श्री नैताम यांची लाचेची मागणी स्पश्ट आहे. परंतु त्यांचा लाचेचा आकडा निष्चित नाही. त्याचप्रमाणे श्री खोब्रागडे, उपसरपंच यांची सुध्दा माझे कामसंबंधाने लाचेची मागणी आहे. परंतु त्यांचा लाचेचा आकडा अद्यापावेतो निष्चित झालेला नसल्याने पुनःपडताळणी करण्यात येईल." मला घरी जाण्यास सांगुन जेव्हा बोलाविण्यात येईल तेव्हा ला.प्र.वि. कार्यालय गडचिरोली येथे येण्याच्या सुचना दिल्या. याबाबतच्या सविस्तर नोंदी सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक श्री राजुलवार यांनी पडताळणी स्थगीती पंचनामा क्रं3 मध्ये घेतल्या आहेत त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री राजुलवार यांनी दि.11/01/2019 रोजी मला बोलावून घेतले. त्यावेळी पंचासमक्ष गैरअर्जदार यांचे विरूद्ध लाच मागणी पुनःपडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगुन त्याप्रमाणे व्हॉईस रेकॉर्डर सुरु करून व्हॉईस रेकॉर्डरवर पंच क्रं. 1 यांचे आवाजाचा नमुना घेवुन व्हॉईस रेकॉर्डर माझे ताब्यात देवुन मला पंच क्रं.1 यांचेसह गैरअर्जदार यांचेकडे जाण्यास रवाना केले. त्यानंतर गै.अ. श्रीमती श्रीगीरीवार, ग्रामसेविका, श्री आनंदराव नैताम, सरपंच व श्री खोब्रागडे, उपसरपंच सर्व ग्रामपंचायत खरपुडी, ता.जि. गडचिरोली व माझी भेट होवून त्यांचे सोबत माझे कामासंबंधाने बोलणी झाली. त्यानंतर मी पंच क्रं. 1 सह पोलीस निरीक्षक श्री राजुलवार यांचेकडे परत आलो असता, पंच क्रं.1 यांच्या आवाजानंतर व्हॉईस रेकॉर्डर बंद करण्यात आला. गै.अ. श्रीमती श्रीगीरीवार, ग्रामसेविका, ग्रामपंचायत खरपुंडी, जि. गडचिरोली यांनी माझे कामासंबंधाने रु.50,000/- लाच रक्कमेची मागणी केलेली असून त्यापैकी गै.अ. श्रीमती श्रीगीरीवार, ग्रामसेविका यांनी तडजोडीअंती रु.40,000/-, गै.अ. आनंदराव नैताम, सरपंच व गै.अ. श्री खोब्रागडे, उपसरपंच यांनी तडजोडीअंती प्रत्येकी रु.25,000/- लाच रक्कम स्विकारण्याची संमती दर्शविली. त्यावरून लोकसेवक श्रीमती श्रीगीरीवार, ग्रामसेविका, श्री आनंदराव नैताम, सरपंच व श्री खोब्रागडे, उपसरपंच ग्रामपंचायत खरपुंडी यांचेविरूद्ध दि.11/01/2019 रोजी पुढील सापळा करण्याचे ठरविण्यात आले. परंतु श्रीमती श्रीगीरीवार, ग्रामसेविका यांचे पती आजारी असल्याने त्या घाईत निघून गेल्याने व माझे ठरावावर सरपंच व ग्रामसेविका यांची स्वाक्षरी होणे बाकी असून काम अपूर्ण होते. त्यामुळे काम पुर्ण झाल्याबाबत माहीती मिळेल त्यादिवशी पुढील लाच सापळा कारवाई करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. त्याचवेळी पोलीस निरिक्षक श्री राजुलवार यांनी माझे कामासंबंधी रू.90,000/- एकुण मागणी असल्यामुळे उर्वरित रक्कम रू.60,000/- मला वेळीच पंचांसमक्ष परत केली. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री राजुलवार यांनी मला घरी जाण्यास सांगुन "जेव्हा तुमचे काम पुर्ण झाल्याबाबत तुम्हाला माहीत होईल. तेव्हा ला.प्र.वि. कार्यालय गडचिरोली येथे यावे." अश्या सुचना दिल्या. याबाबतच्या सविस्तर नोंदी सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक श्री राजुलवार यांनी पडताळणी स्थगीती पंचनामा क्रं 4 मध्ये घेतल्या आहेत.त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री राजुलवार यांनी दि.15/02/2019 रोजी मला बोलावून घेतले व सापळयाचे आयोजन केले. त्यावेळी गै.अ. हे कार्यालयात उपस्थित आहेत किंवा कसे? याबाबत दोन्ही पंचासमक्ष तक्रारदार यांचे मोबाईल फोन क्रमांक 9404830519 वरुन गै.अ. श्री आनंदराव नैताम यांचे मोबाईल फोन क्रमांक 8805952580 वर संपर्क केले असता, गै.अ. श्री आनंदराव नैताम, सरपंच हे त्यांची तसेच उपसरपंच यांचेसाठीची लाच रक्कम स्विकारण्यास टाळाटाळ करीत होते. त्याचप्रमाणे श्रीमती श्रीगीरीवार, ग्रामसेविका व श्री कमलेश खोब्रागडे, उपसरपंच यांचेशी संपर्क न झाल्याने पोलीस निरीक्षक श्री राजुलवार, दोन्ही पंच व माझे मते योग्य वेळी पुढील कार्यवाही करण्याचे ठरविण्यात आले. त्याचवेळी पोलीस निरिक्षक श्री राजुलवार यांनी माझे कामासंबंधी आता केवळ रू.40,000/- ग्रामसेविका मॅडम यांची मागणी असल्यामुळे सरपंच व उपसरपंच यांनी मागुन नाकारलेली उर्वरित रक्कम रू.50,000/- मला वेळीच पंचांसमक्ष परत केली. याबाबतच्या सविस्तर नोंदी सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक श्री राजुलवार यांनी सापळा स्थगीती पंचनामा क्रं 5 मध्ये घेतल्या आहेत.त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री राजुलवार यांनी दिनांक 08/04/2019 रोजी मला बोलावून घेतले व सापळयाचे आयोजन केले. त्याप्रमाणे व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून व्हॉईस रेकॉर्डरवर पंच क्रं. 1 यांचे आवाजाचा नमुना घेवुन व्हॉईस रेकॉर्डर माझे ताब्यात देवुन मला पंच क्रं. 1 यांचेसह गैरअर्जदार यांचेकडे लाच रक्कम देण्याकरीता रवाना केले. त्यावेळी गै.अ. श्रीमती श्रीगीरीवार, ग्रामसेविका हया ग्रामपंचायत कार्यालय दिभना येथे हजर होत्या. त्यावेळी मी गै.अ. श्रीमती श्रीगीरीवार, ग्रामसेविका हया लाच रक्कम स्विकारण्यास टाळाटाळ करीत होत्या. त्यामुळे मी घडलेली हकीकत सांगणेकरीता पंच क्रं. 1 सह पोलीस निरीक्षक श्री राजुलवार यांचेकडे परत आलो असता, पंच क्रं. 1 यांच्या आवाजानंतर व्हॉईस रेकॉर्डर बंद करण्यात आला. याबाबतच्या सविस्तर नोंदी सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक श्री राजुलवार यांनी सापळा स्थगीती पंचनामा क्रं 6 मध्ये घेतल्या आहेत.दिनांक 07.01.2019 ते दिनांक 08.04.2019 पर्यंत केलेल्या सापळा पडताळणी कार्यवाही दरम्यान गै.अ. श्रीमती श्रीगीरीवार, ग्रामसेविका, श्री आनंदराव नैताम, सरपंच व श्री कमलेश खोब्रागडे, उपसरपंच, सर्व ग्रामपंचायत खरपुडी, ता.जि. गडचिरोली यांनी माझे कामासंबंधाने पंच साक्षदारासमक्ष लाच रक्कमेच्या मागणीस संमती दर्शविलेली असुन लाच रक्कमेची सुस्पश्ट मागणी केलेली आहे. म्हणुन माझी त्यांच्याविरूद्ध भ्रष्टाचार प्रतिबंध कायद्यानुसार कायदेशीर फिर्याद आहे. माझी वरिल फिर्याद मराठीत संगणकावर टंकलिखीत केली असुन प्रिंट काढल्यानंतर मी वाचुन पाहीली. ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): dipratan gorakh gaikwad (I (Inspector)) / dgpdggm7601 **or**

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे **Rank** (पद):

**No.**(क्र.): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or**

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14.Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

**15.Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

CA81/3350

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

डयुटी अधिकारी पोलीस स्टेशन गडचिरोली

**Name** (नाम): dipratan gorakh gaikwad

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): dgpdggm7601

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**:**

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known /**
**(**संशयीत/आरोपीचे **(**माहित असलेल्या/पाहिलेल्या**)** शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील**))**

| **S.No.**(अ.क्र.) | **Sex** (लिंग) | **Date/Year of Birth** (जन्म | **Build** (बांधा) | **Height (cms.)** (उंची | **Complexion** (रंग) | **Identification Mark(s)** (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| **1** | **2** | **3** | **4** | **5** | **6** | **7** |
| 1 | महिला | | | | | चेचक के दाग: NO |
| 2 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |
| 3 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| **Deformities/ Peculiarities** | **Teeth** (दात) | **Hair** (केस) | **Eyes** (डोळे) | **Habit(s)** (सवयी) | **Dress Habit(s)** (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| **8** | **9** | **10** | **11** | **12** | **13** |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

| **Language /Dialect** (भाषा/बोलीभाषा) | **Place Of** (का स्थान) | | | | | **Others** (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | **Burn Mark** | **Leucoderma** (कोड) | **Mole** (तिळ) | **Scar** (व्रण) | **Tattoo** (गोदण) | |
| **14** | **15** | **16** | **17** | **18** | **19** | **20** |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(**जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.**)**